साप्ताहिक
अष्टभुजा
# हिरकणी
संपादक : सौ. करुणा अच्युत मोरे
www.hirkani.in
ABD/RNP/40/2021-2023
R.N.I. No. MAHMAR/2020/79822

प्रसिध्द उद्योजिका
प्रज्ञा पोंक्षे
यांचे विशेष
वार्तांकन



Jalna | Volume No. 1, | Issue No. 47, | Monday, Date - 27 September 2021 | Marathi Weekly, | Price 2 Rupees, | Pages - 4
जालना | वर्ष १ ले | अंक ४७ वा | सोमवार दिनांक २७ सप्टेंबर २०२१ | मराठी साप्ताहिक | किंमत २ रुपये | पाने ४ | Mail : hirkaninews@gmail.com

## थोडक्यात...

### दर्जेदार काम करा आ. गोरंट्याल

**जालना । प्रतिनिधी**

मंमादेवी मंदीर मस्तगड ते रेल्वे स्टेशन या रस्त्याच्या सिमेंटीकरणाच्या कामांस सुरुवात करण्यात आली असून या रस्त्याचे काम दर्जेदार होईल याकडे लक्ष द्यावे अशी सुचना आ. कैलास गोरंट्याल यांनी केली आहे.

आ. कैलाश गोरट्याल यांनी राज्य शासनाकडुन वैशिष्टपुर्ण योजने अंतर्गत मंजुर करण्यात आलेल्या या रस्त्याच्या कामाचा शुभारंभ काही दिवसांपुर्वीच केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या शुभहस्ते व जिल्ह्याचे पालकमंत्री राजेश टोपे, आ. कैलास गोरंट्याल, नगराध्यक्षा सौ. संगिताताई गोरंट्याल, युवा नेते अक्षय गोरंट्याल यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले होते. सदर रस्त्याच्या कामाला नुकतीच सुरुवात करण्यात आली असून रस्त्याचे काम करतांना कुठलीही कुचराई सहन केली जाणार नाही असे स्पष्ट करत सदर रस्त्याचे काम दर्जेदार व गुणवत्तापुर्ण करण्याच्या सुचना आ. गोरंट्याल यांनी दिल्या आहेत.

येणाऱ्या कालावधीत वैशिष्टपुर्ण योजने अंतर्गत राज्य शासनाकडुन मंजूरी मिळालेल्या रेल्वे स्टेशन ते पित्ती पेट्रोल पंपापर्यंत या रस्त्याच्या सिमेटी करणाचे काम देखील लवकरच सुरु करण्यात येणार असल्याचे आ. कैलास गोरंट्याल यांनी सांगितले.


सदर काम दर्जेदार करून घेण्यासाठी प्रभागाचे नगरसेवक महावीर ढक्का यांनी सदर कामावर विशेष लक्ष ठेवले असून नगर परिषदेचे अभियंता सय्यद सउद, नगरसेवक विष्णु पाचफुले, नगरसेवक अशोक पवार, नगरसेवक सय्यद आरेफ, अशोक पाटोळे यांनी रस्त्याच्या कामाला नुकतीच भेट दिली.

# स्त्री "शक्ती" ही सर्वश्रेष्ठ शक्ती

## प्रज्ञा पोंक्षे यांचे प्रतिपादन; महिलांना घर घेण्यासाठी देताहेत प्रोत्साहन



**प्रत्येक स्त्रीने स्वतःची शक्ती ओळखून ती वाढविली पाहिजेत. अगोदर स्वतःचा आत्मसन्मान करावा, परंतु आत्मसन्मान म्हणजे अहंकार नव्हे, हे देखील लक्षात ठेवा. प्रत्येक स्त्रीने आपल्या डोळ्यासमोर एक ध्येय निश्चित करावे, ध्येयपूर्तीसाठी स्त्री-पुरुष असा कोणताही भेद न पाळता रात्रंदिवस काम करत राहावे, आलेल्या संकटांना न घाबरता व न कोलमडता तोंड द्यावे. स्वतःमध्ये दडलेली सुप्त शक्ती ओळखून तिचा विकास करा, स्त्री ही कुठलेही काम चांगले करू शकते आणि इच्छाशक्ती प्रबळ असेल तर ते काम करण्यापासून कोणीही तीला थांबवू शकत नाही, स्त्रीशक्ती ही सर्वश्रेष्ठ शक्ती आहे, त्यामुळे या शक्तीला कोणीही रोखू शकत नाही असे प्रतिपादन प्रसिध्द उद्योजिका तथा सामाजिक कार्यकर्त्या प्रज्ञा पोंक्षे यांनी केले.**




**अनिता पवार । छाया म्हात्रे**

कोणतेही क्षेत्र असो आता महिला मागे नाहीत, महिलांनी फक्त स्वतःच्या अंतकरणात डोकावून पाहिले पाहिजे. असा सल्ला प्रज्ञा पोंक्षे यांनी दिला. साप्ताहिक अष्टभुजा हिरकणीच्या वतीने दि. २६ सप्टेंबर २०२१ रोजी आयोजित व्याख्यानाच्या कार्यक्रमात महिलांना मार्गदर्शन करतांना त्या बोलत होत्या. त्रिमीत रचना आणि हर हायनेस्ट च्या माध्यमातून महिलांना परवडणारी घरे मिळवून देण्याचे त्या काम करीत आहेत.

सध्या त्या महिलांनी स्वतःच्या हिंमतीवर आणि कष्ट करुन घर घ्यावे यासाठी त्या विशेष अभियान राबवित असून महिला सक्षमीकरणासाठी त्या उपक्रम राबीत आहेत. फक्त महिलांसाठी घर? कसे, कुठे आणि कधी?... कसे आणि कधी... याचे रहस्य जाणून घेण्यासाठी हिरकणी समूहाच्या वतीने Her High Nest, यासंकल्पनेच्या उद्गात्या प्रज्ञा पोंक्षे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

दादर मुंबई येथील त्रिमित रचना या कंपनीच्या सर्वेसर्वा, नामांकित ऑफिस इंटेरियर-प्रज्ञा पोंक्षे यांनी प्रत्येक स्त्री च्या आयुष्यातील जिव्हाळ्याचा विषय म्हणजे तिचे घर आणि तेही, तिच्या नावावर का आणि कसे घ्यावे यावर सखोल मार्गदर्शन केले.ज्या महिला बेरोजगार आहेत, त्यांना रोजगार कसा उपलब्ध होईल, ज्या महिला रोजगार मिळवतात त्या अधिक सक्षम कशा होतील. ज्या महिला सक्षम आहेत त्या प्रोफेशनल बिझनेस वूमन कशा होतील यावरही त्यांनी अनेक उदाहरणासह मार्गदर्शन केले.

जागतिक कन्यारत्न दिनाच्या शुभेच्छा देताना Everyday is a woman day. असे त्या म्हणाल्या. नवरात्र मध्ये नऊ दुर्गाचा जागर केला जातो. कारण स्त्रिया आत्मविश्वासाने आणि प्रामाणिकपणे काम करतात. एखादी संधी आल्यावर ते काम करण्यासाठी त्याचे कौशल्य जर स्वतःकडे नसेल तर कौशल्य प्राप्त व्यक्तींची त्यामध्ये नक्कीच मदत घ्यावी. एकटीने काम झेपत नसेल तर सामूहिकरीत्या ते काम पूर्ण करावे, कोणतेही काम हे अतिशय चांगल्या दर्जाचे असावे आणि वेळेचे नियोजन करून काम वेळेत पूर्ण करावे. हेच खऱ्या यशाचे गमक आहे.

आज आपण एकविसाव्या शतकात जगत असलो, तरीही, आचार आणि विचाराने मात्र अजूनही आपल्याकडे पाहिजे तितकी प्रगल्भता आलेली नाही. विचारांचे उदात्तीकरण झालेले नाही. स्त्री सर्व कुटुंब घडवत असते, मुलांवर संस्कार करण्याचे कामही स्त्रीच करत असते. त्यामुळे पिढी दर पिढी विचार रुजविण्याचे पुरुषी मानसिकतेमध्ये बदल करण्याचे कार्यही यापुढे स्त्रियांनाच करायचे आहे. प्रत्येक स्त्रीने स्वतःच्या नावावर घर करणे गरजेचे आहे. त्याच बरोबर स्वतःच्या मुलीच्या नावावरही घर करणे गरजेचे आहे. जेंव्हा स्त्रीच्या नावावर भर असेल, तेंव्हा तिचा आत्मसन्मान, आत्मबल वाढेल. स्त्रियांनी साडी, कपडे, दागिन्यांमध्ये पैसे न गुंतविता सोन्याचे बिस्किट्स, प्रॉपर्टी शेअर, मॅच्युअल फंड अशा ठिकाणी पैशांची गुंतवणूक करावी. त्यातूनच स्वतःसाठी स्वतःच्या नावावर घर करता येईल असेही त्यांनी सांगितले.

२००८ पासून Her High Nest या संकल्पनेवर काम करत आहेत आणि २०१८ ते २०२१ दरम्यान हे काम जास्त जोमाने चालले आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील कमीत कमी एक हजार महिलांना स्वतःचे घर करून देण्याचा संकल्प पूर्ण करण्यासाठी Her High Nest ने HDFC बँकेसोबत करारही केलेला आहे.

मुंबई चेंबूर भागात टिळक नगर येथे २७६ बेडचे वर्किंग वुमन्स होस्टेल, पुणे वाकड येथे वुमन्स होस्टेल, लॉक डाऊन च्या काळात वर्किंग वुमन साठी वर्क फ्रॉम होम ऐवजी वर्कस्टेशन सुरू करून महिलांना टेबल स्पेस दिला त्या ठिकाणी त्यांचे चहा नाष्टा जेवणाची सोय केली. (पान २ वर)

# कोकणी डॉक्टर असोसिएशन अंतर्गत आरोग्य शिबिरास उस्फुर्त प्रतिसाद



**श्रीवर्धन । प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्मान सेना शाखा-वडवली आयोजित कोकणी डॉक्टर असोसिएशन अंतर्गत, हॉस्पिटल म्हसळा यांच्या सहकार्याने शुक्रवार दि.१७ सप्टेंबर २०२१ रोजी भव्य आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले, सदर शिबिरामध्ये विविध आजारांवर तपासणी करून चिकीत्सा करण्यात आली, एकूण ३५४ रुग्णांनी उस्फुर्त प्रतिसाद देऊन लाभ घेतला, या कार्यक्रमाप्रसंगी अखंड आगरी समाज अध्यक्ष संतोष रामा नात्ती, मनसे श्रीवर्धन तालुका अध्यक्ष सुशांत सुधीर पाटील, मनसे तालुका सचिव सुमित सावंत, कोकणी डॉक्टर असोसिएशनचे उपाध्यक्ष डॉ. नसीम खान, उपसरपंच दिपक कांबळे, हरिचन्द्र चाळके, संतोष बाळाराम धुमाळ, नवनाथ कांबळे, महेश कांबळे, सुदेश पांडुरंग कांबळे, निलेश सहदेव नात्ती, नवनाथ नात्ती आदि मान्यवर उपस्थित होते. सदर शिबिरासाठी ४ तज्ञ डॉक्टर, २ नर्स, ३ मदतनीस स्टाफ यांचे सहकार्य लाभले. यावेळी १००० सॅनिटरी पॅड वाटप करण्यात आले.

इंडीयन फास्ट
आम्ही फक्त ग्राहकांचा
विश्वास कमावतो
आमच्या सेवा
कामगार नोंदणी, ड्रायव्हिंग लायसेन्स, पोलीस व्हेरीफिकेशन, अपंग नोंदणी, न्यूज सर्विस, पॅन कार्ड, मतदाने नोंदणी, आधार कार्ड, पासपोर्ट, कर्ज योजना, शेतकरी योजना, विद्यार्थी योजना, रेल्वे रिझर्वेशन, ट्रॅव्हल्स बुकींग, शॉप ॲक्ट लायसेन्स, उद्योग आधार, नावात बदल, हेल्थ विमा, मोटारसायकल, फोर व्हिलर विमा.
* संपर्क *
7558412574

पाहिजेत
नांदेड
आणि जालना
शहरात
डिलिव्हरी बॉय
पाहिजेत




पगार १० ते
२० हजार
संपर्क
7558412574

इंडियन फास्ट
घर किंवा ऑफिस
किरायाने द्या विश्वासाने
* घरमालक यांचे फायदे *
- किरायादाराचा स्वभाव मनासारखा
- किरायादाराचे चारित्र्य आगोदरच समजणार
- गुन्हेगार आहे की नाही याची खात्री मिळणार
- अपेक्षेप्रमाणे किरायादार मिळणार
- भाडे करार रेडीमेंड करुन मिळणार
- जवळच्या पोलीस स्टेशनला माहिती होणार
याचाच अर्थ किरायादार हा विश्वासाचा मिळणार, मग वेळ कसली लावताय !
संपर्क साधा : 7558412574

विवाह नोंदणी
विवाहइच्छुक तरुण-तरुणी, घटस्फोटीत, विधवा यांच्यासह सर्वच जाती धर्माच्या स्थळांसाठी आजच आपली नाव नोंदणी करा.
सामुहीक विवाह सोहळा, शासकीय योजनांच्या लाभाची सुविधी
विश्वासाची आणि खात्रीलायक स्थळे उपलब्ध
संपर्क : 9224133263
मराठवाडा
यु.बी.एस.एस. संस्था
शॉप. नं. ४, कचेरी रोड, विठ्ठला हॉस्पीटल जवळ, शनिमंदीर, जुना जालना, जालना
पश्चिम महाराष्ट्र
यु.बी.एस.एस. संस्था
सिध्दार्थ नगर, गिरवी, ता. फलटण, जि. सातारा. मो. नं. ८६०००८००६५

फायद्याचं बोला
वृत्तपत्र कोणतेही असो
* मांडणी व सजावट योग्य असावी.
* वाचकांच्या पसंतीस यावी.
* जाहिरातदार यांना आकर्षण वाटावं.
* स्वस्तात आणि मस्त ते फक्त आमच्याकडेच




साप्ताहिक, दैनिक आणि मासिकाचे पेज सेटअप करा फक्त ३०० रुपयात. आजच संपर्क साधा : 7558412574
साप्ताहिक, दैनिक नोंदणी करुन मिळेल, संपर्क : 7558412574

# संपादकीय...

## आता आम्ही पेन उचलणार...

वाटलं होतं आता काहीच शिल्लक राहिलं नाही, परंतू आज पुन्हा हात वळ वळ करु लगाला, काहीतरी लिहावं वाटू लागलं, कुणास ठाऊक असं का होऊ लागले. थोडा वेळ थांबले आणि विचार केला की, आपण हिरकणी सोबत जोडले गेलो आहोत, आणि तिथे महिलांच्या प्रेमळ वातावरणात आपण जे काही वाचत आहोत त्यातुनच ही पुन्हा लिहिण्याची इच्छा निर्माण झाली. अशा प्रतिक्रिया आम्हाला आता राज्यभरातून येऊ लागल्या आहेत. महिलांनी स्वतःसह परिसरात होणाऱ्या अत्याचाराला विरोध करायला सुरुवात केली आहे. आपल्या भावना आता कागदावर उतरवू लागल्या आहेत. त्यामुळे आता महिलांमध्ये मोठे परिवर्तन होत तर आहेच शिवाय त्यांच्या मताला आणि साहित्याला किंमत सुध्दा मिळू लागली आहे. वर्षानुवर्ष पुरुषी परंपरेला छेद देत महिला आता पत्रकारितेच्या क्षेत्रात सुध्दा आपले नाव कमवू लागल्या आहेत.

हिरकणीच्या ग्रुपवर आलेल्या प्रत्येकीच्या तोंडी आता एकच शब्द निघू लागला आहे. आम्ही आजपर्यंत फक्त पाहत होतो, परंतु आता पाहणार नाही तर गल्लीतला आवाज दिल्लीत पोहचविणार असल्याचे बोलू लागल्या आहेत. आम्ही सुध्दा पेन उचलणार आणि अन्यायाविरोधात आवाज उठवणार असा एल्गार आता महिलांनी केला आहे. त्यामुळे आता अन्याय करणाऱ्याची खैर नाही. एकदा महिला लिहित्या झाल्या की समजा क्रांतीला सुरुवात झाली म्हणून समजा.

# भावनिक चक्र



भावनाविवश होऊन तुझ्यापुढे
भावनांचा कल्लोळ केला,
न जाणता असा कोणता मी गुन्हा केला...
तशी वेळ यायला नको होती ती
पण, तरीही
तोच अपराध मी पुन्हा पुन्हा केला...

आयुष्याने बांधलेली दुहेरी खूणगाठ सोडवणं तेवढं सोपं नसतं.

गिव्ह अँड टेक ह्याच तत्वावर प्रत्येकाचे जीवन आधारित असते. तुम्ही एखाद्या भावनीक गोष्टीची किती किंमत मोजता त्यावर तुमच्या सुखाचा आणि दुःखाचाही दर्जा ठरवला जातो. इथे प्रत्येक भावनिक गोष्टीची अशी एक किंमत आधीच ठरलेली आहे. कधी ती आपण स्वखुशीने मोजतो तर कधी मनाविरुद्ध आपल्याला ती मोजून फेडावी लागते ....

इथे मोफत असं काहीच नसतं.
जिथं किंमत मोजावी लागेल तिथे मात्र
भावनाशुन्य होऊनच जगावं लागतं

भावनिक दुष्टचक्रात अडकल्यानंतर त्यातून सुटका सहसा होत नाही. मग हेच आपलं प्राक्तन म्हणत इथेच आयुष्याची संध्याकाळ व्यतीत करावी लागते. भावनिक रित्या गुंतलेल्या ह्या लौकिक जगाचा मोह इतका असतो की गोष्टींची व्यर्थता लक्षात येऊनही ह्या मायेतून सुटावं असं मात्र वाटत नाही.

जे सगळ्यांना मिळतं ते मलाही मिळायला हवं

ह्या सार्वजनिक सुखात आपण स्वतःला सुरक्षित समजू लागतो. ह्या भुरळ पाडणाऱ्या गोष्टी मुळे आपण खऱ्या सुखापासून वंचित होतं राहतो.. आणि मग त्याची खूप मोठी किंमत आपल्याला मोजली लागती ह्याची जाणीव अंतिम काही श्वास उरले असताना होते.

ज्याच्यासाठी आलो होतो त्या दिशेने एकाही श्वासाचा प्रवास न करता आपण निघून जातोय हे लक्षात येत पण वेळ निघून गेलेली असते . ह्या भावनिक मायेची मगरमिठी इतकी घट्ट की हे अर्थशून्य धुकं डोळ्यासमोरून कधी दूर सारलं जातच नाही...

त्यामुळे भावनिक सुखापासून स्वतःला वंचित ठेवून काही निर्भिड पावलं उचलावीत...मग काय कुणाला कशात सुख लाभेल हे आपण सांगू शकत नाही म्हणूनच एखाद्या गोष्टीसाठी मोजलेली किंमत आपण ठरवू शकत नाही. आपल्या दृष्टिकोनातून मौल्यवान असलेली गोष्ट साधू संतांच्या दृष्टीने मात्र मातीमोलाची असू शकते... खरंय ना..!

**सौ. रूचिरा बेटकर**
**नांदेड**
**९९७०७७४२११**

# अविस्मरणीय कोकण टूर



**दावा कोकणची निळी निळी खाडी,**
**दोन्ही तिरांना हिरवी हिरवी झाडी,**
**भगवा अबोली फुलांचा ताटवा,**
**गोमू माहेराला जाते हो नाखवा,**
**हिच्या घोवाला कोकण दाखवा.**

दरवर्षी आम्ही मैत्रिणींनी सोबत टूर काढत असतो त्यातील काढलेला हा अविस्मरणीय टूर..... थोडसं का होईना संसाराच्या व्यापातून उसंत मिळावी म्हणून टूर चा आनंद घेण्यास आम्ही मैत्रिणी दरवर्षी कुठेना कुठे टूरचे नियोजन करत असतो, म्हणून २ फेब्रुवारी २०२० मध्ये आम्ही सर्वांनी मिळून टूर काढायचा ठरवले. सर्व आम्ही मैत्रिणींनीच(महिलांनी) जाण्याची, राहण्याची ऑनलाइन बुकिंग करून सर्वसामावेश नियोजन केले.

निघण्याचा तो दिवस उजाडला. तीन दिवस बिचवर नेमके काय करायचे असे मनात शेकडो प्रश्न मनात निर्माण झालेले होते. कारण या अगोदर आम्ही कधीच बीचेस बघितलेलेच नव्हते. मग आम्ही रेल्वेप्रवासकरत सिंधुदुर्ग मध्ये पोहचलो. सिंधुदुर्ग हे दूरदृष्टी दाखवणारे स्थापत्यकलेचे उत्कृष्ट नमुने असे अभेद्य किल्ले ही बघायला मिळाले. पुढे आम्ही तारकर्ली या ठिकाणी पोहचलो. तारकर्ली हे कोकणातील अरबी समुद्राच्या किनाऱ्यावरील प्रेक्षणिय पर्यटनस्थळ आहे. मालवणपासून ७ किमी अंतरावर स्वच्छ, सुंदर, विलोभनीय समुद्रकिनारा आणि खाडी यांच्या अनोख्या संगमातून तयार झालेले अद्भूत सौंदर्य आम्हाला बघण्यास मिळाले. समुद्राच्या फेसलेल्या लाटा पाहून, रुपेरी, स्वच्छ वाळूचा किनारा,सुपारी, बांबू ची झाडे पाहून प्रवासातील सर्व शीण निघून गेला. तेथे आम्ही

बोटी मध्ये प्रवास करून स्कुबा डायव्हिंगचा मनसोक्त आनंद घेतला.प्रवासात तेथील सर्व प्रकारच्या जेवणाचा येथेच्छ स्वाद आम्ही घेतला. तारकर्ली बीच सोबत वायरी बिच, भोगवे बिच, देवबाग बिच असे अनेक बीच आम्ही बघितले. देवबागबीचवर पॅराग्लायडिंग करून मनसोक्त आनंद घेतला. काही ठिकाणी घोडागाडी सवारी तर कुठे उंटावरून सवारी केली या सर्वामध्ये आम्हाला आमचे बालपण आठवत होते.



विस्तीर्ण पसरलेला समुद्रकिनारा पायांना कोमल स्पर्श करणारी मऊ वाळू कोवळे उन स्वर्ग यापेक्षा काय? वेगवेगळ्या बीचवर स्वर्गीय आनंद आम्ही घेतला.

**✻ उषा मनोहर चव्हाण ✻**
**(प्राथमिक पदवीधर)**
**९०४९८२३३८८**
**के. प्रा. शाळा भारज बुद्रुक,**
**ता. जाफ्राबाद जि. जालना**

**साहित्य, जाहिराती पाठवा आणि हजारो वाचकांपर्यत पोहचा**

साप्ताहिक अष्टभुजा हिरकणी हे महाराष्ट्रातील महिलांचे पहिलेच मुखपत्र असून अवघ्या काहीच दिवसात राज्यभरात लोकप्रिय झाले आहे. राज्यभरातून हजारो वाचकांच्या आवडीचे वृत्तपत्र ठरले आहे. या वृत्तपत्रात लेख, कथा, कविता, प्रवासवर्णन पाठवावू शकता. तसेच आपल्या व्यवसायाची जाहिराती देऊन आपला व्यवसाय वाढवू शकता. **- सौ. विद्याताई निकाळजे, कार्यकारी संपादक**

**विशेष सुचना**

या वृत्तपत्रात प्रसिध्द होणाऱ्या जाहिराती व साहित्य हे जाहिरातदार आणि वाचक यांनी दिलेले असते. ते पडताळून पाहने शक्य नाही. त्यामुळे भविष्यात कोणताही आर्थिक व्यवहार किंवा कॉपीराईटचा प्रश्न उद्भवल्यास त्याला सा. अष्टभुजा हिरकणी जबाबदार राहणार नाही.

**पान १ वरुन**

**स्त्री शक्ती ही...**

अशाप्रकारे त्यांच्या विविध उपक्रमांची माहिती देऊन महिलांना प्रोत्साहन दिले.हे सर्व करणे शक्य झाले ते केवळ शिक्षणामुळे. स्त्रियांसाठी शिक्षणाची द्वारे उघडी करून देणाऱ्या क्रांतिसूर्य ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या चरणी कृतज्ञतेची शब्दसुमने वाहून त्यांनी व्याख्यानाचा समारोप केला.

# श्राध्द आणि श्रध्दा



**भारती मोरे**
**डोंबिवली**

आपल्याकडे पितृ पंधरवड्यात श्राध्द करण्याची पध्दत आहे. श्रध्देने करतात ते श्राध्द ! आपल्या मृत वाडवडिलांचे स्मरण करणे, त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करणे हा यामागील मुख्य हेतू !

साधारणपणे पारंपरिक पध्दतीने श्राध्द केले जाते. काही व्यक्ती मात्र यासंदर्भात वेगळा विचार करताना दिसतात.

मळलेल्या वाटेवरून चालत राहणे नेहमीच सोपे असते. पण प्रवाहाबरोबर न चालणार्यांना मात्र टीकेला सामोरे जावे लागते. श्रध्देची संकल्पना बदलणाऱ्या, नवे पर्याय शोधून ते कृतीत आणणार्या व्यक्ति आणि संस्था - संघटनाच समाजात विधायक बदल घडवून आणतात.

पतिच्या निधनानंतर एकट्या राहणार्या वीणाताई पितृपक्षात कावळ्याला पान न ठेवता एका गरजू कुटुंबाला / सेवाभावी संस्थेला आर्थिक मदत करतात. मंदाताईंना विणकामाचा छंद आहे. आईची आठवण म्हणून त्या अनाथालयातील बालकांना स्वेटर्स विणून पाठवतात.

काही मंडळी पितृपक्षात एखाद्या वृध्दाश्रमाला भेट देतात. तिथल्या वृध्दांसोबत थोडा वेळ घालवतात. त्यांच्यासोबत एकत्र जेवण किंवा चहा नाश्ता घेतात. त्याचा खर्च आश्रमाला देणगीरूपात देतात.

आपण या मंडळींच्या कृतीचे अनुकरण केले तर सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने पुढे जाणे निश्चितपणे शक्य होईल. बघा पटतंय का ..?

## निरोप बाप्पाला

दहा दिवस राहीलात पाहुणा होऊन ,
गणेशा ! का जाता आम्हाला सोडून ?।।धृ.।।

तूम्ही येताच आमच्या घरी
बरसल्या श्रावण भादव्याच्या सरी
मोद वाहीला ओसंडून...गणेशा....

रूप तुमचे आगळे वेगळे
कसे आकर्षित होती सगळे
लहान मोठे होती सेवेत तल्लीन...गणेशा...

वक्रतुंड चतुर्भूज साजे
पायी घागर्या रूणझुण वाजे
मोदक खातो फार आवडीनं...गणेशा !...

तुमचा उत्सव आनंदाचा
किती उल्हास तना-मनाचा
भक्ती भावानं सारे करती पुजन...गणेशा !..

वार्षीक उत्सव किती थाटाचा
हर्ष द्विगुणीत लहान मोठ्यांचा
निरोप देता माञ येती डोळे भरूनं..गणेशा ! ...

बाप्पा ! आम्हाला नको हो काही
कमी करा माञ ही महागाई
पर्जन्यमान होऊ दे , समाधानान...गणेशा !....

विनंती करते जोडून कर
पुढच्या वर्षी या ,पण आणू नका महापूर
म माया म दुर्वांकुर वाहते श्रध्देनं
गणेशा ! का जाता
आम्हाला सोडूनी



**माया तळणकर**
**नांदेड.**
**९३२५०२८३७६**

## एकदा मेणबत्ती ऐवजी..बलात्कारी पेटवला तर..?

काय अवस्था होत असेल..त्या नाजूक शरीराची..
एक आर्त किंचाळी घुमते..त्या नाजूक जीवाची..
छाटले जातात जणू.. एका पाखराचे पर..
एकदा मेणबत्ती ऐवजी..बलात्कारी पेटवला तर..?

कस जगायच तिने सांगा..कस फिरायचं बिनधास्त..
पवित्र नजरे पेक्षा..इथ वासनिक नजरा जास्त..
खुलेआम उडवली जाते..भररस्त्यात तिची टर..
एकदा मेणबत्ती ऐवजी..बलात्कारी पेटवला तर..?

अहो महिलाच काय तर..कोवळ्या मुली सोडत नाही..
सुख हवं असत तात्पुरत..काही फरक पडत नाही..
आकांत करतो तो जीव..लचके तोडतात हैवान नर..
एकदा मेणबत्ती ऐवजी..बलात्कारी पेटवला तर..?

नरकयातना कुणाकुणाला..भोगाव्या लागल्या फार..
बलात्कार करून नंतर..नाजूक अवयवावर केले वार..
कोणी मदतीला नाही येत..नाही पोचत लवकर..
एकदा मेणबत्ती ऐवजी..बलात्कारी पेटवला तर..?

कायदा महान आहेच की..पण होतो खूप उशीर..
पाहू शकत नाही कुटुंब..ठेऊ शकत नाही धीर..
त्वरित फाशी व्हावी बस..मन म्हणत चौरंगा कर..
एकदा मेणबत्ती ऐवजी..बलात्कारी पेटवला तर..?

माझ्या शिवबा च्या राज्यात..सुखी होती प्रजा..
स्त्रिया ही समाधानी..कारण छत्रपती होते राजा..
हातपाय कलम व्हायचे..अशी घटना घडली जर..
एकदा मेणबत्ती ऐवजी..बलात्कारी पेटवला तर..?

मन व्याकुळ होत हो..काही करू शकत नाही आपण..
फक्त निषेध करू शकतो..मिळून सर्वजण..
विनंती न्याय व्यवस्थेला..न्याय पटकन द्या कधीतर..
एकदा मेणबत्ती ऐवजी..बलात्कारी पेटवले तर..?



**अमोल थिटे, माढा, जि. सोलापूर**

# संजय होळकर व विद्याधर पाटील राज्यस्तरीय जीवनदीप शिक्षकरत्न पुरस्काराने सन्मानित

**तृप्ती भोईर**

उरण तालुक्यातील मोठीजुई येथील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे शिक्षक संजय होळकर व सारडे येथील रयत शिक्षण संस्थेचे न्यु इंग्लिश स्कूल, उलवे या शाळेचे शिक्षक विद्याधर पाटील यांना यावर्षीचा राज्यस्तरीय जीवनदिप शिक्षकरत्न पुरस्कार देवून गौरविण्यात आले आहे.



महाराष्ट्रातील एकुण ३५ शिक्षक, शिक्षीका तर ५ शैक्षणिक संस्थांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या पुरस्कार वितरणाचा सोहळा जीवनदीप महाविद्यालय गोविळे-टिटवाळा ठाणे या ठिकाणी मोठ्या दिमाखात आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा झाला.

शाल, श्रीफळ, सन्मान चिन्ह , सन्मान पत्र व वंदनीय आणि पुजनीय तुळशी चे रोप असे या पुरस्काराचे स्वरूप होते. या सुंदर कार्यक्रमाची सुरुवात गणेश पुजन व दिपप्रज्वलन करून झाली. त्यानंतर कलर मराठी वाहिनीवरील नवोदित गायींकानी सुंदर ते ध्यान उभे विटेवरी या अभंवाणीतील भक्तीरसाने मंत्रमुग्ध केले.

पुरस्कार वितरण सोहळ्याचे अध्यक्षस्थान मुरबाड चे आमदार किसन कथोरे यांनी भुषविले. प्रमुख पाहुणे म्हणून कोकण पदवीधर मतदार संघाचे आमदार निरंजन डावखरे हे होते.

त्याचप्रमाणे शिवसेना जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, रविंद्रजी घोडविंदे, विजय यादव, विरेंद्र ठाकुर असे विविध मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन राष्ट्रपती आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक विश्वनाथ पाटील यांनी केले. या कार्यक्रमाचे आयोजन जीवनदीप महाविद्यालयाचे प्राचार्य व त्यांच्या सहकाऱ्यांनी यशस्वीपणे पार पाडले.

# उरण पंचायत समितीच्या सभापती पदी शेकापच्या सौ समिधा निलेश म्हात्रे यांची निवड

**संगिता पवार । अश्विनी धोत्रे**



उरण पंचायत समितीच्या सभापती पदासाठी शेकापच्या आवरे गणाच्या सदस्या सौ समिधा निलेश म्हात्रे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.यावेळी नवनिर्वाचित सभापती सौ समिधा निलेश म्हात्रे यांचे मोठ्या उत्साहात नगराध्यक्ष जे एम म्हात्रे, उरण पंचायत समितीचे सभापती नरेश घरत, सभापती काशिनाथ पाटील ॲड. सागर कडू, उपसभापती सौ शुभांगी सुरेश पाटील यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

उरण पंचायत समितीत आठ सदस्य संख्या असून यामध्ये शेकापचे पाच,शिवसेनेचे दोन आणि भाजपाचा एक सदस्य आहे. उरण पंचायत समितीचे सभापती अँड सागर कडू यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने, रिक्त झालेल्या उरण पंचायत समितीच्या सभापती पदासाठी सोमवारी ( दि२० ) निवडणूक निर्णय अधिकारी तथा उरणचे तहसीलदार भाऊसाहेब अंधारे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी एन एन गाडे यांच्या उपस्थितीत निवडणूक प्रक्रिया पार पडली.यावेळी सौ समिधा निलेश म्हात्रे यांचा एकमेव अर्ज आल्याने निवडणूक निर्णय अधिकारी तथा उरणचे तहसीलदार भाऊसाहेब अंधारे यांनी उरणच्या सभापती पदासाठी सौ. समिधा म्हात्रे या निवडून आल्याचे घोषित केले. माजी आमदार विवेक पाटील याचे अत्यंत जवळचे, विश्वासू सहकारी निलेश म्हात्रे यांच्या पत्नी तथा उरण पंचायत समितीच्या सदस्या सौ समिधा म्हात्रे यांची सभापती पदी वर्णी लागल्याने नवनिर्वाचित सभापती सौ समिधा निलेश म्हात्रे यांचे उपसभापती सौ शुभांगी सुरेश पाटील,उरण पंचायत समितीचे सदस्या वैशाली पाटील,दिक्षा पाटील, दिपक ठाकूर,हिराजी घरत,माजी नगराध्यक्ष जे एम म्हात्रे,माजी सभापती काशिनाथ पाटील, शेकापच्या जेष्ठ नेत्या माधुरी गोसावी, शेकापचे चिटणीस मेघनाथ तांडेल, नगरसेविका प्रितीजाँज म्हात्रे, जासई सरपंच संतोष घरत, युवा संघटना नेते रमाकांत पाटील, चंद्रकांत पाटील, बाबूराव पालकर,संदिप गावंड, सुरेश पाटील,जीवन म्हात्रे, नरेंद्र मुंबईकर सह महाविकास आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या

# वीर वाजेकर महाविद्यालयात कर्मवीर जयंती सोहळा संपन्न

उरण । प्रतिनिधी

उरण तालुक्यातील फुंडे येथील वीर वाजेकर महाविद्यालयात पदमभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३४ वी जयंती सोहळा शुक्रवार ( दि. २४ ) रोजी संपन्न झाला.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून महात्मा फुले कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,पनवेल येथील प्राचार्य, डॉ.गणेश ठाकूर, (माजी सचिव, रयत शिक्षण संस्था सातारा) यांनी आभासी प्रणालीद्वारे उपस्थित प्राध्यापक, सेवक व विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले. डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे जीवनचरित्र व त्यांचा कार्याचा आढावा घेतला.

# कारखानदाराना पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्या विरोधात पँथर्स आर्मीचे आमरण उपोषण

**जालना । प्रतिनिधी**

प्रदूषण नियंत्रण मंडळ अधिकाऱ्याला गेल्या एक ते दीड महिन्यापासून पँथर्स आर्मीच्या वतीने प्रदूषण नियंत्रण करावे यासाठी वारंवार पत्रव्यवहार करूनही प्रदूषण नियंत्रण मंडळ अधिकारी यांनी कारखान्यावर कुठलीही कारवाई केली नाही प्रदूषण मंडळ अधिकारी कारखानदारांना पाठीशी घालण्याचे काम करत आहे या ठिकाणी मोठा भ्रष्टाचार होत आहे. त्याकरिता आम्ही संविधानिक मार्गाने प्रदूषण नियंत्रण मंडळ अधिकारी जालना या कार्यालयासमोर आमरण उपोषण चालू केले आहे असे किशोर खिल्लारे यांनी म्हटले.

या उपोषणाला विविध संघटनेचे पदाधिकारी व ग्रामस्थ कामगार भेटी देऊन गेलेत जोपर्यंत या प्रदूषित कारखान्यावर कार्यवाही होत नाही तोपर्यंत पँथर्स आर्मी हे उपोषण उठणार नाही अशी ठाम भूमिका पँथर्स आर्मी चे राष्ट्रीय अध्यक्ष किशोर खिल्लारे यांनी घेतली आहे या उपोषणा वेळी मराठवाडा अध्यक्ष अनिल खरे मराठवाडा युवक अध्यक्ष अनिल त्रिगोटे मराठवाडा महासचिव करण जगधने जालना जिल्ह्याचे जिल्हा अध्यक्ष सिद्धार्थ खरात जालना जिल्ह्याचे चित्रपट आघाडी जिल्हाध्यक्ष गौतम शेळके औरंगाबाद जिल्हा कोषाध्यक्ष देवा भालेराव यांची उपस्थिती होती तसेच ग्रामीणचे संदीप संदीप सोनवणे सचिन खरात दिनेश आदमाने पवन रत्नपारखे व इतर ग्रामस्थांनी भेटी दिल्या व आम्ही तुमच्या सोबत आहे असे शब्द दिले अमचा पूर्ण पाठिंबा तुम्हाला आहे असे आव्हाहन केले




गोरगरिब जनता कामगार वर्ग व वन्य प्राण्यांसाठी भर पावसात पँथर्स आर्मीचे उपोषण सुरू आहे जो पर्यंत कारखान्यावर कारवाई होत नाही तोपर्यंत उपोषण उठल्या जाणार नाही जे अधिकारी कारखानदारांना पाठीशी घालतात त्यांची ही चौकशी करून कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी असे पँथर्स आर्मीचे राष्ट्रीय अध्यक्ष किशोर खिल्लारे यांनी म्हंटले आहे.



# जासई हायस्कूल मध्ये डॉ कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३४ वी जयंती साजरी

**संगिता पवार । उरण**

रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनिअर कॉलेज, जासई या विद्यालयात रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक,थोर शिक्षण महर्षी, गोर-गरिबांचे कैवारी, पद्मभूषण, डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३४ वा जयंती सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या प्रसंगी कर्मवीर अण्णांच्या पुतळ्याचे व प्रतिमेचे पूजन करण्यात आले तसेच विद्यालयाच्या प्रांगणातील महापुरुषांच्या पुतळ्यांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून पूजन केले.

कर्मवीर जयंती निमित्ताने कर्मवीर आण्णांच्या पालखी सोहळ्याचे आयोजन केले गेले, पुष्पमाला व फुलांनी सजलेल्या आणि त्यात कर्मवीर अण्णांची प्रतिमा विराजमान असलेल्या पालखी ची मिरवणूक विद्यालयाच्या प्रांगणात घोषणांच्या आतिषबाजीत स्कूल कमिटी,शिक्षक व ग्रामस्थ यांनी काढली.

या कार्यक्रमा प्रसंगी विद्यालयातील सेवानिवृत्त शिक्षिका सौ. घरत टी. टी. यांनी विद्यालयास अहुजा कंपनीची एमप्ली फायर मशीन भेट दिली.

या जयंती सोहळ्यास जेष्ठ कामगार नेते व भारतीय मजदुर संघाचे राष्ट्रीय महामंत्री सुरेश पाटील, चेअरमन अरुण जगे, माजी सभापती श्री नरेश घरत, व्हॉईस चेअरमन सखाराम घरत, शिक्षण प्रेमी यशवंत घरत, मधुकर पाटील, अमृत ठाकूर, रघुनाथ ठाकूर, धर्मदास घरत, गणेश पाटील इत्यादी मान्यवर आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

हा जयंती सोहळा कार्यक्रम यशस्वी करण्यामध्ये विद्यालयाचे प्राचार्य व रयत शिक्षण संस्थेचे लाईफवर्कर अरुण घाग, उपमुख्याध्यापक मोरे पी. पी, पर्यवेक्षक साळुंखे आर. एस.आणि सर्व रयत सेवकांनी मेहनत घेतली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रयत सेवक संघाचे उपाध्यक्ष श्री नूरा शेख सर यांनी केले.

## पान ४ वरुन

### कॉम्रेड ज्योती म्हात्रे...

यावेळी जेएनपीटीचे कामगार विश्वस्त कॉम्रेड भूषण पाटील, अलिबाग नगर पालिकेच्या उपनगराध्यक्ष मानसी म्हात्रे, जेएनपीटी विश्वस्त दिनेश पाटील, कॉम्रेड नयन म्हात्रे, जनवादी महिला संघटनेच्या महाराष्ट्र राज्य उपाध्यक्षा हेमलता पाटील, जिल्हा सचिव अमिता ठाकूर, उरणच्या माजी उपनगराध्यक्ष नाहिदा ठाकूर, माजी नगरसेविका अफशा मुकरी, शेकापच्या महिला नेत्या सीमा घरत, जनवादीच्या प्रमिला म्हात्रे, चंपा पाटील, कुसुम ठाकूर, सुनंदा वाघमारे, राजश्री म्हात्रे, किसान सभेचे रायगड जिल्हा अध्यक्ष रामचंद्र म्हात्रे, डी. वाय. एफ. आय. युवक संघटनेचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष संतोष ठाकूर, दादरपाडा येथील वसंत मोहिते तसेच कॉम्रेड ज्योती म्हात्रे यांचे जावई मनोज कडू व नाती नुपूर आणि मैथिली या दोघींनी ही आपल्या आजीच्या आठवणींना यावेळी उजाळा दिला. यावेळी कॉम्रेड ज्योती म्हात्रे यांचं महिलांना न्याय देण्याचं कार्य पुढं नेण्याचा निर्धार करण्यात आला.

### प्रा. अशोककुमार दवणे...

यांच्या सुविद्य पत्नी वैजयंतीमाला दवणे, मुलगी अभियंता दक्षता दवणे, उत्कर्षा दवणे यांची उपस्थिती होती. इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड या संस्थेने प्रा. अशोककुमार दवणे यांच्या मराठी भाषेत २०१२ कवितांचा संग्रह असलेल्या ममाझ्या मरणाआधीचा जाहीरनामाफ या महाकाव्य ग्रंथास भारतातील सर्वात मोठा कवितासंग्रह असल्याची नोंद करुन मानपत्र, मानचिन्ह, पदक, पेन, लोगोसह त्यांना सन्मानित केले आहे. याचेच औचित्य साधून डॉ. जगदीश कदम आणि समीक्षक गंगाधर ढवळे यांनी दवणे यांचा सत्कार केला. दवणे यांचे चिरंजीव प्रशिक दवणे हेही सिव्हिल इंजिनिअर आहेत. या संघर्षशील कुटुंबात सर्वच उच्चविद्याविभूषित आहेत. या पार्श्वभूमीवर डॉ. कदम यांनी अशोक दवणे यांची छोटी मुलाखत घेतली. विचारलेल्या सर्वच प्रश्नांना दवणे यांनी सडेतोड उत्तरे दिली. यातून प्रा. दवणे यांच्या अनन्यसाधारण कार्याचे अंतरंग उलगडले. दोन दिग्गज साहित्यिकांमध्ये ही मैफल जवळपास एक तास रंगली होती.

### कामगारांना कामावर न घेण्याचा...

आणले व कारवाई केली व एक बैठक घेऊन तोडगा निघतोय का ते बघू असे पोलीस निरीक्षक शिरीष पवार यांनी सांगितले. आणि कंपनी प्रशासन, ठेकेदार, कामगार उपायुक्त, मनसे कामगार प्रतिनिधी यांच्यात एक बैठक पोलिसठाण्यात झाली पण तेथे लीडर कामगार सोडून इतर लोकांना कामावर घेऊ असे कंपनीने सांगितले पण सर्व कामगारांना घ्या अशी इहयुनिक मनसे ने घेतल्याने तोडगा निघाला नाही. त्या बैठकीत काय निर्णय झाला ते मनसे कडून जाहीर केले जाईल पण नियोजित पत्रकार परिषद ही अचानक रद्द केल्याने मनसेची भूमिका समजू शकली नव्हती. आप आज अचानक कामगार नेते सचिन गोळे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. सचिन गोळे यांनी आज लेबर कोर्टात कामगारांच्या बाजूने पहिला न्याय मिळाला असल्याचे सांगितले. कोर्टाने दिलेली नो टर्मिनेशन ची ऑर्डर त्यानी पत्रकारांना दाखवली व कंपनीने कोणतीही फरवसुचना न देता या ४८ कामगारांना बेकायदेशीर रित्या कामावरून कमी केल्याचे सांगितले. कंपनीला व दुसऱ्या कामगार युनियनला मनसे ची युनियन येथे नको म्हणून हा खेळलेला कुटील डाव असल्याचे आरोप गोळे यांनी केला. कोर्टाच्या या निर्णयामुळे मनसेच्या पदाधिकारी व कामगारांनी केक कापून आनंद साजरा केला व उद्या सर्व कामगार कामावर जातील असे सांगितले.

### आ. महेश बालदी यांच्या...

नमेडियम स्कूल मोरा येथे मोफत कोरोना १९ वॅक्सिनेशन सोमवार (दि. २०) रोजी पासून सुरु करण्यात आली आहे. पहिला डोस देण्यांत आला.

उद्घाटन प्रसंगी उरण उपनगराध्यक्ष जयविन कोळी, हितेश शाह, माजी नगरसेविका नंदा माजगावकर, माजी नगरसेवक राजेश कोळी, विनायक कोळी, रोहित कोळी, अप्पू कोळी आदी उपस्थित होते.

Printer, Publisher, & Owner Karuna Achut More, Printed at Mandar Offset & Printers, Plot No. 43, Vrundawan Colony, Kacheri Road, Old Jalna, Jalna - 431203 (Maharashtra) and Published at Office Weekly Ashtabhuja Hirkani, House No. 327, Near Mammadevi Kirana Store, Om Shanti Galli, Sambhaji Nagar, Jalna. Tq. Dist. Jalna. - 431203 (Maharashtra), Editor : Karuna Achut More, Mob. No.9850516724,
**R.N.I. No. MAHMAR/2020/79822**, E Mail Id : - hirkaninews@gmail.com

**हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक करुणा अच्युत मोरे यांनी मंदार ऑफसेट अ‍ॅन्ड प्रिंटर्स, प्लॉट नं. ४३, वृंदावन कॉलनी, कचेरी रोड, जुना जालना ता. जि. जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय साप्ताहिक अष्टभुजा हिरकणी, घर नं. ३२७, मंम्मादेवी किराणा जवळ, ओम शांती गल्ली, संभाजी नगर, जालना. ता. जि. जालना-४३१२०३ (महाराष्ट्र), येथे प्रकाशित केले. संपादक : करुणा अच्युत मोरे, मो.नं. ९८५०५१६७२४, आर.एन.आय. नं. R.N.I. No. MAHMAR/2020/79822, E Mail Id :** - hirkaninews@gmail.com

